अतारांकित प्रश्नोत्तरांची ११ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील गृहनिर्माण संस्थांच्या प्रिमियममध्ये सवलत व मुदतवाढ देण्याबाबत.

(१) २४६ (२८-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान शासकीय कब्जे हक्काच्या जमिनीचे रुपातंरण मालकी हक्क फ्री होल्डमध्ये करण्यासाठी प्रिमियम योजना जाहीर करुन त्याअंतर्गत जमिनीच्या ५ व १० टक्के प्रिमियम आकारण्याची सवलत दिली असून त्याची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान असून दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ पासून उक्त जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यासाठी ६० ते ७५ टक्के इतका प्रिमियम भरावा लागत असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहनिर्माण संस्थांना अर्ज करण्याची मुदत ६ महिन्याची अपुरी असून इतक्या कमी कालावधीत गृहनिर्माण संस्थांच्या सर्वसाधारण सभेत संमती घेऊन कार्यवाही करणे अशक्य असल्याने उक्त कार्यवाही करण्याकरिता किमान ३ वर्षाची मुदत मिळावी यासाठी फेडरेशन ऑफ ग्रान्टीस ऑफ गव्हर्नमेंट लँन्डसच्या सरचिटणीसांनी मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सुमारे ३ हजार गृहनिर्माण संस्थांच्या जीर्ण इमारतीच्या पुनर्विकासाची समस्या सोडविण्यासाठी शासनाकडे कुठलेही धोरण नसल्यामुळे उक्त संस्थांना मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०८-२०२५) : (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे. शासन अधिसूचना दिनांक १६.०३.२०२५ अन्वये भाडेपट्ट्याने/कब्जेहक्काने भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी धारण करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्था, ज्या स्वयंपुनर्विकास करणाऱ्या व उपलब्ध होणाऱ्या वाढीव चटईक्षेत्र निर्देशकांच्या (FSI) पैकी २५% प्रधानमंत्री आवास योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यास तयार होतील अशा गृहनिर्माण संस्थांना ५% तर स्वयंपुनर्विकास न करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना १०% सवलतीच्या दराने लागू होती. या सवलतीची मुदत दिनांक ३०.०९.२०२४ रोजी संपल्यामुळे अशा वर नमूद सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिनांक ०१.१०.२०२४ पासून त्यांच्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्यासाठी अनुक्रमे ७५% व ६०% अधिमूल्याची रक्कम शासनजमा करावी लागत होती. परंतु, सदर सवलतीची मुदत दिनांक ०४.०३.२०२५ रोजीच्या सुधारणेन्वये दिनांक ३१.१२.२०२५ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.
(३) महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करणे) नियम, २०२५ दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यान्वये सवलतीच्या दराने आकारावयाच्या अधिमूल्याच्या मुदतीचा कालावधी दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे.

तद्नंतर, प्राप्त होणाऱ्या अर्जावर निर्धारित दराने अधिमूल्य आकारून संबंधित गृहनिर्माण संस्थांना भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने धारण केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याची कार्यवाही करता येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतंर्गत निशुल्क प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत

(२) ४२३ (२८-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) या संस्थेअंतर्गत घेण्यात येणारे एमपीएसी, यूपीएसी, आयबीपीएस व पोलीस भरतीचे निशुल्क प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून एक वर्ष पुर्ण होऊनही त्याची अद्यापही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून 'बार्टी' संस्थेतर्फे नि:शुल्क प्रशिक्षण केंद्र उभारण्यास विलंब होण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार बार्टी या संस्थेमार्फत सर्व जिल्हयात विविध परीक्षांचे प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संजय शिरसाट (१२-०९-२०२५) : (१) हे खरे नाही. बार्टीमार्फत घेण्यात येणारे एमपीएसी, यूपीएसी, आयबीपीएस व पोलीस भरतीचे नि:शुल्क प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत शासनामार्फत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. राज्यातील विविध शासकीय संस्थांकडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अनुसूचित जाती आणि जमाती आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांची पदे रिक्त असल्याबाबत

(३) ४८८ (२५-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती-जमाती आयोगास संवैधानिक दर्जा देण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांची अनेक पदे रिक्त असल्याने आयोगापुढे सुमारे ९०० प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त आयोगास संवैधानिक दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संजय शिरसाट (१९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक१६ सप्टेंबर, २०२४ अन्वये सदर आयोगावर १ अध्यक्ष व २ सदस्य यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाकडे प्रलंबित असलेले प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही आयोग स्तरावर सुरू आहे.

(३) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग व महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग असे दोन स्वतंत्र आयोग स्थापन करून त्यांस वैधानिक दर्जा देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ॲट्रॉसिटी कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

(४) ५२० (२५-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यावरील वाढत्या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी ॲट्रॉसिटी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकारी समितीची बैठक माहे ऑगस्ट, २०१८ पासून झाली नाही , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठका न घेतल्यामुळे जिल्हा आणि तालुका स्तरावरही अशा बैठका प्रशासनानेही घेतल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यात ॲट्रॉसिटी ॲक्ट कायदा निष्प्रभ होत असल्याने याबाबत शासनाने सदर ॲक्टच्या अंमलबजावणीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (०१-०८-२०२५) :(१) होय.

(२) नाही,हे खरे नाही.

(३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी भा.प्र.से.संवर्गातील अधिकाऱ्याची दिनांक २२.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. राज्यस्तरीय दक्षता व नियंत्रण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.राज्यात सहा विशेष न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहे. विशेष सरकारी वकीलांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या कल्याणासाठी अनुसूचित जाती विशेष घटक उपयोजनेतंर्गत निधीचे वाटप करण्यात येते. तसेच,आंतरजातीय विवाह करणाऱ्या पात्र जोडप्यास शासनाकडून नियमानुसार अर्थसहाय्य देण्यात येते.

तसेच, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची बैठक आयोजित करण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या सोयीचा दिनांक व वेळ उपलब्ध करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील टेंभू, म्हैसाळ योजनांच्या लाभक्षेत्रातील शेतजमिनींच्या ७/१२ वरील इतर हक्कांमध्ये पुनर्वसनासाठी राखीव शेरे असल्याबाबत

(५) ५२३ (२९-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील टेंभू, म्हैसाळ योजनांच्या लाभक्षेत्रातील शेतजमिनींच्या ७/१२ वरील इतर हक्कांमध्ये पुनर्वसनासाठी राखीव शेरे असल्यामुळे शेतक-यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्या दरम्यान महसूल विभागाने शासन परिपत्रक क्र.आरपीए/३६२४/७२७/प्र.क्र.२२१/र-४ नुसार निर्णय घेऊन एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मकरंद जाधव (पाटील) (०३-०९-२०२५) : (१) महसुल व वन शासन परिपत्रक दिनांक १४.०८.२०२४ अन्वये सांगली जिल्ह्यातील टेंभू, म्हैसाळ व कृष्णा कोयना प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र खातेदारांच्या क्षेत्राच्या ७/१२ च्या इतर हक्कातील पुनर्वसनासाठीचे राखीव शेरे कमी करणेस मान्यता देण्यात आलेली आहेत.

(२) उक्त शासन परिपत्रकानुसार टेंभू प्रकल्पांतर्गत खानापूर, आटपाडी, तासगाव व कवठेमहांकाळ तालुक्यातील गावामधील व कृष्णा कोयना प्रकल्पातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, कडेगाव, खानापूर व पलूस या तालुक्यातील गावामधील लाभक्षेत्रातील शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारातील पुनर्वसनाचे राखीव शेरे कमी करण्यास विहीत कार्यपध्दती अटींची पुर्तता करुन कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी सांगली यांचेमार्फत विहीत कार्यपध्दतीनुसार पुर्तता करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेंगाणवाडी, ऐनवाडी व पोसेवाडी (ता.खानापूर, जि.सांगली) येथील ग्रामस्थांना वन विभागाकडून नोटीस आल्याबाबत

(६) १११९ (२५-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेंगाणवाडी, ऐनवाडी व पोसेवाडी (ता.खानापूर, जि.सांगली) येथील ग्रामस्थांची घरे निष्कासित करण्याबाबत वनविभागाकडून ग्रामस्थांना नोटीस पाठविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेघर होणाऱ्या ग्रामस्थांना न्याय देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (२२-०८-२०२५) : (१) व (२) वन जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी भारतीय वन अधिनियम, १९२७ अन्वये कायदेशीर कारवाई करण्याचे प्रावधान आहे. मौजे मेंगाणवाडी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील वनकक्ष क्र. १९५ मधील राखीव वनक्षेत्रामध्ये अतिक्रमण केल्याप्रकरणी ८९ अतिक्रमणधारकांवर तर मौजे पोसेवाडी (ता. खानापूर, जि. सांगली) येथील वनकक्ष क्र. १८९ मधील राखीव वनक्षेत्रामध्ये अतिक्रमण केल्याप्रकरणी ९६ अतिक्रमणधारकांच्यावर भारतीय वन अधिनियम,१९२७ अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला असून त्यांना याबाबत कायदेशीर नोटीस देण्यात आली आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचा अवलंब करुन अतिक्रमणधारकांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे व अमरावती जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना नोंदणी करूनही अनुदान न मिळाल्याबाबत

(७) १२५५ (२९-०४-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्याची शासनाची भूमिका असून त्यासाठी शासनाकडून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या ५११ जोडप्यांना नोंदणी करूनही मागील दोन वर्षापासून अनुदान मिळाले नाही तसेच दोन-तीन वर्षात एकदा कधीतरी एकदम निधी येतो आणि मग त्याचे वितरण लाभार्थ्यांना केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे जिल्हयात आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या ५०० लाभार्थ्यांना दोन वर्षापासून अनुदान मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम अदा करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर योजनेतील पात्र लाभार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून डायरेक्ट बँक ट्रान्सफर योजनेद्वारे (डीबीटी) रक्कम संबंधितांच्या संयुक्त खात्यात जमा करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१५-०९-२०२५) :(१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून (५०:५०) याप्रमाणात राबविण्यात येते. केंद्र शासनाकडून त्यांचा हिस्सा प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाचा हिस्सा खर्च करता येत नाही. केंद्र शासनाकडून सदर योजनेअंतर्गत राज्य शासनास अर्थसहाय्य प्राप्त झाले असून राज्यातील अमरावती व पुणे जिल्हयासह सर्व जिल्हयातील प्रलंबित लाभार्थ्यांच्या संयुक्त बँक खात्यामध्ये अनुदान वितरणाची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) होय.
(५) आंतरजातीय विवाह योजनेअंतर्गत ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारून ऑनलाईन पीएफएमएस प्रणालीव्दारे पात्र लाभार्थ्यांच्या संयुक्त खात्यामध्ये अनुदान जमा करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

सांगोला वनपरिक्षेत्रातील रोजंदारी वनमजूर कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत

(८) १९८० (२६-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर वनविभागांतर्गत सांगोला वनपरिक्षेत्रात सन २०१६ पासून रोजंदारीवर काम करणाऱ्या श्री.चंद्रकांत चव्हाण, श्री.तानाजी क्रेंगार, श्री.राजेंद्र चव्हाण, श्री.अक्षय मोरे व श्री.संभाजी बाडरे या वनमजूरांना सेवेत कायम सामावून घेण्याबाबतची मागणी रोजंदारी वनमजूर तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००४ पर्यंत ज्या रोजंदारी वनमजुरांची सेवा ५ वर्षे तुटक तुटक रितीने २४० दिवस भरले त्या वनमजूरांना सन २०१२ व २०१८ मध्ये सेवेत कायम केले आहेत, त्याच धर्तीवर सन २०१६ पासून काम करीत असलेल्या रोजंदारी मजूरांना सेवेत सामावून घेण्याची मागणी रोजंदारी मजुरांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनातर्फे १२९९१ वनसेवक (वनमजूर) ही पदे सरळसेवेमार्फत भरण्यात येणार असल्याने याप्रकरणी रोजंदारीवर काम करणाऱ्या वनमजूरांना प्राधान्य देऊन सेवेत सामावून घेवून न्याय देण्याची मागणी वनमजूरांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (२५-०७-२०२५) :
(१) व (२) हे खरे नाही. शासन निर्णय, दिनांक १६/१०/२०१२ नुसार, वन विभागांमध्ये योजनातंर्गत / योजनेत्तर योजनेमध्ये ज्या रोजंदारी मजूरांनी दिनांक ०१/११/१९९४ ते दिनांक३०/०६/२००४ पर्यंत प्रतिवर्ष २४० दिवस याप्रमाणे सलग पध्दतीने अथवा तुटक-तुटकरित्या ५ वर्षांची सेवा पूर्ण केली आहे, अशा रोजंदारी मजुरांना दिनांक०१/०६/२०१२ पासून अधिसंख्य वनमजूर या पदावर कायम करण्याची तरतूद आहे.

श्री. चंद्रकांत भिमराव चव्हाण, श्री. तानाजी केंगर, श्री. राजेंद्र चव्हाण, श्री. अक्षय मोरे व श्री. संभाजी बाडरे या मजूरांनी माहे एप्रिल, २०१६ ते जानेवारी, २०२५ या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात हंगामी मजूर म्हणून काम केले आहे. सदरहू तरतुदींची पुर्तता उक्त मजूर करीत नसल्याने त्यांना सेवेत सामावून घेता येत नाही.
(३), (४) व (५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), नागपूर यांच्याकडून वन विभागात वनसेवक (गट-ड) या संवर्गाची १३५२५ तसेच वनसेवक (बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत) १०१६५ अशी एकूण २३६९० नवीन पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून, प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

दरम्यान, सदरहू पदांची भरती करतांना रोजंदारी वनमजूरांना प्राधान्य देण्याबाबत वन कामगार संघटना, पुणे यांचे दिनांक २९/०१/२०२५ व अन्य वनमजुरांचे दिनांक२४/०२/२०२५ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

राज्यात अनुसूचित जातीच्या कल्याणकारी योजनांकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

(९) २२६७ (२९-०४-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सामाजिक न्याय विभागास विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी एकूण अर्थसंकल्पाच्या तरतुदीपैकी १३ टक्के निधी उपलब्ध करून दिला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४-२५ या वर्षात राज्याची एकूण अर्थसंकल्पीय तरतूद ६,१२,२९३ कोटी रुपये असताना त्यांच्या १३ टक्के प्रमाणात ७९,५९८ कोटी रुपये निधी सामाजिक न्याय विभागास उपलब्ध करून दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधी सामाजिक न्याय विभागास दिला नसल्यास त्याची कारणे काय आहेत, तसेच राज्यातील अनुसूचित जातीच्या लोकांसाठी विविध योजनांकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१५-०९-२०२५) :(१), (२) व (३) वित्त विभागाच्या दिनांक २७.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या वर्षापासून योजनांतर्गत कार्यक्रमांमधील पायाभूत सुविधांच्या विकासाबाबतचे कार्यक्रम वगळता उर्वरित सर्व वैयक्तिक – लाभार्थ्यांसाठीच्या कार्यक्रमांसाठी त्या योजनांचा ११.८% निधी अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांसाठी देण्याबाबत सूत्र लागू करण्यात आले आहे. सदर सुत्रानुसार योजनांकरिता निधीची तरतूद करण्यात येत आहे. तसेच वार्षिक कार्यक्रम २०२४-२०२५ चे एकूण आकारमान रु.१,९२,०००.०० कोटी इतके असून, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमास रु.१५८९३.०० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमास २०२४-२५ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नियतव्ययाची एकूण वार्षिक कार्यक्रमाची टक्केवारी ८.२८ % इतकी आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सहाय्यक संशोधन अधिकारी (कुणबी समिती) हे पद नियमित करण्याबाबत

(१०) २८७३ (२८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती येथे सहाय्यक संशोधन अधिकारी (कुणबी समिती) हे पद नियमित (आकृतीबंध) करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. संजय शिरसाट (१९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी वंशावळ जुळविण्याची कार्यवाही करण्याकरिता शासन निर्णय, दिनांक २५.०१.२०२४ अन्वये तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीवर सहाय्यक संशोधन अधिकारी ही पदे बार्टीमार्फत बाह्यस्त्रोत यंत्रणेद्वारे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार कंत्राटी तत्त्वावर घेण्यात आलेली आहेत. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने नियुक्ती दिलेल्या संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत अशी स्पष्ट तरतूद केलेली आहे. त्यामुळे सहाय्यक संशोधन अधिकारी (कुणबी समिती) हे पद नियमित (आकृतीबंध) करणे नियमानुकूल व नियमोचीत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत निधी प्राप्त न झाल्यामुळे विकास कामे प्रलंबित असल्याबाबत

(११) ३०७९ (२९-०४-२०२५). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या दोन्ही आर्थिक वर्षामध्ये निधी प्राप्त न झाल्यामुळे दलित वस्त्यांमधील विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलित वस्त्यांच्या विकास कामांकरिता नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत उक्त दोन्ही आर्थिक वर्षामध्ये निधी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त निधी वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१५-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही. जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत प्रत्येक जिल्ह्याला शासनाकडून निधी वितरीत करण्यात येतो. सदरील निधी कोणत्या योजनेसाठी खर्च करावयाचा याबाबतचे सर्वाधिकार प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीस आहेत.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना ही जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अंतर्गत राबविण्यात येत असून या योजनेकरिता अनुक्रमे सन २०२३-२०२४ मध्ये अर्थसंकल्पीत रु.१२१७.९१ कोटी

तसेच सन २०२४-२०२५ मध्ये अर्थसंकल्पीत रु.१२६३.४७ कोटी इतका १००% निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गतची कामे निधी अभावी प्रलंबित नसून, सदर कामे वेळेत पूर्ण करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजा चेकतिरवंजा (कवठी) (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील गाव तलाव राखीव वन घोषित न करण्याबाबत

(१२) ४१६३ (२५-०४-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा चेकतिरवंजा (कवठी) (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) येथील गाव तलाव राखीव क्षेत्र सर्व्हे क्र.१०७ आराजी. ६.८७ असून ही जागा गावासाठी राखीव तलावाची जागा म्हणून आरक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेवर पाण्याचा तलाव तात्पुरत्या स्वरुपाचा असल्याने या ठिकाणाचे पाणी कमी-कमी होऊन मोकळी जागा निर्माण झाली आहे, तसेच शेतीच्या उपयोगासाठी तलावाचे खोलीकरण करण्याकरिता ग्रामपंचायतीकडून शासनाकडे पत्राद्वारे निवेदन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाची जागा सहकारी मालमत्ता व्यवस्थेकरिता ग्रामपंचायतीचे तिरवंजा हस्तांतरित केला असल्याने ही जागा वन विभागामार्फत जमाबंदी करण्यात येवू नये यासाठी येथील ग्रामस्थांनी विशेष ग्रामसभेनुसार सार्वजनिक आक्षेप नोंदविला असून सदर जागा वन विभागाला देण्याबाबतचे आदेश झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जागा वन विभागामार्फत राखीव वन घोषित न करण्याकरीता ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (२२-०८-२०२५) :

(१), (२), (३), (४) व (५) भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अंतर्गत दिनांक २०/०२/२०१९ च्या अधिसूचनेन्वये चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती तालुक्यातील एकूण १३ गावांचे क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून त्यामध्ये मौजे चेकतिरवंजा या गावातील सर्व्हे नंबर १०७ क्षेत्र ६.८७ हे. चा समावेश आहे. सदर क्षेत्राच्या वनजमाबंदी चौकशीकरीता उप विभागीय अधिकारी, वरोरा, जि. चंद्रपूर यांची वनजमाबंदी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. वनजमाबंदी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वरोरा यांनी विहित पध्दतीने चौकशीची प्रक्रिया केली असता, चौकशीदरम्यान विहित मुदतीत कोणतीही वैयक्तिक तथा सार्वजनिक किंवा संस्थेव्दारे लिखीत स्वरुपात दावे / हरकती प्राप्त न झाल्याने दिनांक २०/०८/२०२४ रोजी भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ११ ते १६ अंतर्गत आदेश पारित करण्यात आले आहेत. तथापि तद्नंतर मौजा चकतिरवंजा ग्रामपंचायतीमार्फत वनजमाबंदी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्याकडे दिनांक १/१०/२०२४ रोजी सर्व्हे नंबर १०७ क्षेत्र ६.८७ "राखीव वन" म्हणून गठित न करण्याची विनंती दिनांक १/१०/२०२४ च्या निवेदनान्वये करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी वनजमाबंदी अधिकारी यांच्याकडून वनजमाबंदी चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने जल वाहन नेटवर्कसाठी डीपीआर तयार केला असल्याबाबत

(१३) ४१७४ (३०-०४-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने जल वाहन नेटवर्कसाठी सन २०१७ मध्ये एक डीपीआर तयार केला असून त्यात ३० पैकी २९ नियोजित मार्ग रद्द करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने मान्यता दिली आहे काय, असल्यास या डीपीआरचे भविष्यातील नियोजन काय आहे,
(३) तसेच या डीपीआरमध्ये अणुशक्तीनगर स्थित ट्रॉम्बे जेटीचा समावेश करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नितेश राणे (३०-०९-२०२५) : (१) नाही. जलवाहतूक क्षेत्राच्या विकासावर लक्ष केंद्रित करून भविष्यातील जलवाहतूक विकास आराखडा तयार करण्यासाठी स्वतंत्र वॉटर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन स्थापन करण्यासंबंधी महाराष्ट्र सागरी मंडळाने ऑक्टोबर २०१८ मध्ये क्रिसील या सल्लागार संस्थेमार्फत एक अभ्यास अहवाल तयार करवून घेतला.
(२) सदरहू अहवालामध्ये, सध्याच्या टप्प्यावर वॉटर ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन स्थापन करणे व्यवहार्य नसल्याचा निष्कर्ष निघाल्याने त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
(३) नाही .
(४) तथापि, मुंबई महानगर प्रदेशातील जलवाहतूक सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये नेमलेल्या कोची मेट्रो रेल लि. या सल्लागार संस्थेने ८ एप्रिल २०२५ रोजी सदरचा अहवाल सादर केला आहे. सदरहू अहवालाचा अभ्यास करुन जलवाहतूकीची क्षमता असलेले संभाव्य जलमार्ग आणि अधिक विकासासाठी कार्यरत जलमार्ग ओळखण्यात आले असून, त्यावर आधारित सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी रुपरेषा तयार करण्यात येत आहे. ट्रॉम्बे जेटीवरून प्रवासी जलवाहतूक प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असून, ट्रॉम्बे येथील जेट्टी ही मत्स्यव्यवसाय विभागाकडून बांधण्यात आलेली असून सद्यस्थितीत ती मासेमारीसाठी वापरली जाते. सदर जेट्टीजवळ पाण्याची खोली अत्यंत कमी असल्याने, ओहोटीच्या वेळी जेट्टीजवळील भाग पुर्णपणे सूकून जातो. त्यामुळे सदर ठिकाणी प्रवासी जलवाहतूकीसाठी वाव, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासणी करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्हयातील भूमी अभिलेख विभागाचे अधिक्षक पद रिक्त असल्याबाबत

(१४) ४३०२ (२७-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील भूमी अभिलेख कार्यालयातील प्रमुख असलेले अधिक्षक पद मागील अनेक दिवसांपासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे स्थानिक अधिकारीच नसल्याने जिल्हयात जमीन मोजणीची सुमारे १३०० प्रकरणे प्रलंबित आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना कार्यालयात फेऱ्या माराव्या लागत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन सदर रिक्त पदांवर पूर्णवेळ अधिक्षक नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) : (१) होय, अंशत: खरे आहे. वाशिम जिल्ह्यातील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख हे पद दिनांक २२.०६.२०२४ पासून रिक्त आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख हे पद जिल्हा स्तरावरील नियंत्रण अधिकारी पद असून या कार्यालयाकडून मोजणीची कार्यवाही केली जात नाही. जमीन मोजणीची कार्यवाही उप अधीक्षक भूमि अभिलेख या

कार्यालयाकडून केली जाते.

वाशिम जिल्ह्यामध्ये माहे डिसेंबर २०२४ अखेरची मोजणीची २६३ मुदतबाह्य प्रकरणे मोजणीवर शिल्लक आहेत. दिनांक ०१.०१.२०२४ ते ३०.०४.२०२५ या कालावधीमध्ये ३८८४ प्रकरणात मोजणीची कार्यवाही पूर्ण करुन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. मुदतबाह्य झालेली २६३ प्रकरणे सुद्धा निकाली करण्याची कार्यवाही उप अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या स्तरावरून केली जात आहे. इतर मोजणीची प्रकरणे मुदतीवर आहेत.

(३) जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख संवर्गात एकूण १२ पदे रिक्त असून सदर रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे.

४)प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड जिल्ह्यातील उपअधिक्षक भूमिअभिलेख कार्यालयात होत असलेली अनियमितता

(१५) ४५३७ (३०-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील उपअधिक्षक भूमिअभिलेख कार्यालयात बीड शहर व तालुक्यातील नागरिक व ग्रामस्थांना विविध कामासाठी कार्यालयात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपअधिक्षक व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी नियमानुसार होत असलेल्या वा नसलेल्या कामास मोठ्या प्रमाणात आर्थिक मागणी करतात व ती पूर्ण न झाल्यास अनेक महिने वा वर्ष नागरिकांच्या कामकाजास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत मागणी, तक्रार व निवेदने विभागाकडे पत्राद्वारे करुनही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक ३ मे, २०२४ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे, तथापि, सद्य:स्थितीत मोजणी अर्ज, फेरफार नोंद अर्ज, तसेच मिळकत पत्रिका, उतारे याबाबत जनतेस ऑनलाईन सेवा उपलब्ध असल्याने या बाबींसाठी नागरिकांना प्रथम कार्यालयात जाण्याची आवश्यकता नाही.

(२) हे खरे नाही, तथापि, उप अधीक्षक भूमी अभिलेख, बीड कार्यालयात एकुण ७ पदे रिक्त आहेत, तसेच मागील ४ महिन्यांपासून गुंठेवारी मोजणी प्रकरणांची आवक जास्त प्रमाणात असल्याने कार्यालयात प्रकरणे प्रलंबित राहत आहेत. जनतेशी निगडीत असणाऱ्या सेवा या प्रामुख्याने ऑनलाईनच उपलब्ध आहेत.

(३) दिनांक ०३ मे, २०२४ रोजी याबाबत लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वारणा व चांदोली प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

(१६) ४५५५ (२८-०४-२०२५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारणा व चांदोली प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसनासाठी आराखड्याबाहेरील (८ कि.मी. बाहेरील) जमीन मागणी केली असल्याचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या जमिनी शासन निर्णय आरपीए-२०२१/प्र.क्र.१२९/र-१ दिनांक १४/१०/२०२१ अन्वये वर्ग-१ करण्यासाठी भोगवटा मुल्याची किंमत ही १२% व्याज आकारणीसह केली जात असल्याने गरीब शेतकरी सदरची रक्कम भरण्यास असमर्थ ठरतात, तरीही अशा जमिनी सरसकट विनामूल्य वर्ग-१ करुन देण्यासंदर्भात शासनस्तरावर प्रस्ताव प्रलंबित आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. मकरंद जाधव (पाटील) (२८-०७-२०२५) : (१) जिल्हाधिकारी, सांगली यांच्या कार्यालयाकडे वारणा व चांदोली प्रकल्पग्रस्तांचे नियोजनाबाहेरील जमिन मागणीसंदर्भात ३ अर्ज प्राप्त असुन त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत अर्जदार यांना कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही. महसुल व वन विभाग शासन निर्णय आरपीए-२०२१/प्र.क्र.१२९/र-१ दिनांक १४.१०.२०२१ नुसार प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप प्रकरणी कब्जेहक्काच्या रकमेची परीगणना करणेसंदर्भात स्पष्टता करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पश्चिम विदर्भातील महसूल यंत्रणेतील कार्यालयांना स्वत:ची इमारत उपलब्ध करून देण्याबाबत

(१७) ४८९५ (२८-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भातील महसूल यंत्रणेतील १८९४ कार्यालयांना हक्काची इमारत नसल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावपातळीवर अत्यंत महत्वाच्या असलेल्या १५८५ तलाठी व २६८ मंडळ अधिकारी कार्यालये सद्यस्थितीत भाड्याच्या जागेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पश्चिम विदर्भातील महसूल यंत्रणेतील कार्यालयांना स्वत:ची इमारत उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०२५): (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) पश्चिम विदर्भात महसूल यंत्रणेतील अमरावती जिल्हयात एकूण ९४ मंडळ अधिकारी कार्यालये असून त्यापैकी ४५ मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम मंजूर आहेत. त्यातील ३६ मंडळ कार्यालयाचे बांधकाम पुर्ण असून ०७ बांधकामे प्रगतीत आहेत. तसेच ०२ मंडळ अधिकारी कार्यालय बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

तसेच अमरावती जिल्हयात एकूण ५७० तलाठी कार्यालये आहेत. त्यापैकी १८९ तलाठी कार्यालयाचे बांधकाम मंजूर असून त्यापैकी १३३ कार्यालयाचे बांधकाम पुर्ण व २९ तलाठी कार्यालयाचे बांधकाम प्रगतीत असून २७ तलाठी कार्यालयाकरीता जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

अकोला-अकोला जिल्हयामध्ये एकूण ३१८ तलाठी व ५२ मंडळ अधिकारी कार्यालये आहेत. त्यापैकी २६७ तलाठी व ३० मंडळ अधिकारी कार्यालय बांधकामास शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून मान्यताप्राप्त बांधकामाच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्ष ४४ तलाठी व ०५ मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे.

यवतमाळ- यवतमाळ जिल्हयामध्ये एकूण ६८२ तलाठी कार्यालयांपैकी ३०२ तलाठी कार्यालयाचे बांधकाम झालेले

आहे. तसेच मंडळ अधिकारी कार्यालये एकूण ११० असून त्याचे बांधकाम करणे आवश्यक आहे.
वाशिम- वाशिम जिल्हयामध्ये एकूण ४६ मंडळ कार्यालये व २८० तलाठी कार्यालये असून त्यापैकी १३ मंडळ अधिकारी व १० तलाठी कार्यालय बांधकामास प्रशासकीय मान्यता असून बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे.
बुलढाणा- बुलढाणा जिल्हयात ५३५ तलाठी कार्यालये व ९२ मंडळ कार्यालये असून त्यापैकी ४३२ तलाठी कार्यालये व ७३ मंडळ अधिकारी कार्यालयाचे बांधकामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.
अमरावती / अकोला / यवतमाळ / वाशिम व बुलढाणा या जिल्हयाकडून आवश्यकतेनुसार इमारत बांधकामाकरीता मुख्य अभियंता, यांच्या तांत्रिक मान्यतेसह अदयावत दरसूचीवर आधारीत परिपुर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त होताच, कामाची निकड व निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात आदिवासी विकास विभागाकरिता निधीचा विनियोग योग्य पद्धतीने करुन संपूर्ण विकास करण्याबाबत

(१८) ५४८५ (२७-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागासाठी स्वतंत्र ९.३५ टक्क्यांचा अर्थसंकल्प असला तरी आदिवासींचा विकास तेवढ्या प्रमाणात होत नाही तसेच आदिवासी लोकांना आरक्षण व शासकीय नोकर भरतीत योग्य संधी दिली जात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा न केल्यामुळे आश्रमशाळांना इयत्ता पहिलीसाठी विद्यार्थीच मिळत नसल्याकारणाने २९ शाळा शासनाकडे वर्ग झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सध्या सुरु असलेल्या आश्रमशाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, संगणक शिक्षण, इतर संसाधने, आदिवासी उमेदवारांसाठी विशेष भरती मोहिम व आदिवासी विकास निधीचा विनियोग योग्य पद्धतीने करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (२३-०९-२०२५) : (१) वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अर्थसंकल्पित केलेल्या निधीमधून आदिवासींचा अधिकाधिक विकास व्हावा, यासाठी राज्य व जिल्हा स्तरावरुन विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आरक्षण अधिनियमानुसार राज्यातील शैक्षणिक संस्था प्रवेश व लोक सेवांमधील सेवेत सरळसेवा भरतीच्या राज्यस्तरीय पदांमध्ये अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : बीसीसी,२०१८/प्र.क्र.१५३/१६-ब, दिनांक २३.०९.२०२१ अन्वये अनुसूचित जमाती लोकसंख्या अधिक असलेल्या आदिवासी बहुल ८ जिल्ह्यांमध्ये गट-क व गट-ड संवर्गातील पदांसाठी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरिता वाढीव आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना शासकीय भरतीत योग्य संधी दिली जात नाही, हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

आश्रमशाळांना इयत्ता पहिलीसाठी विद्यार्थी मिळत नसल्याकारणाने २९ शाळा शासनाकडे वर्ग झालेल्या नाहीत. परंतु काही शासकीय आश्रमशाळांमध्ये इ. १ ली ते इ. ४ थी या वर्गाची पटसंख्या ही मंजूर क्षमतेपेक्षा कमी आहे.
(३) अधिकाधिक मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना गुणवत्तापूर्वक आणि दर्जेदार शिक्षण देण्यासाठी ४९७ शासकीय आश्रमशाळांमध्ये गुरुशाला उपक्रम, २०० आश्रमशाळांमध्ये सामाजिक व भावनिक शिक्षणाचा उपक्रम, १२१ आदर्श शासकीय आश्रमशाळांमध्ये डिजीटल शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे व ७३ शासकीय

आश्रमशाळांमध्ये नमो विज्ञान केंद्र उभारणी करणे यासारखे उपक्रम राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत आदिवासी विकास विभागामार्फत सरळसेवा भरती, २०२४ मधील ६११ पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर जाहिरातीमधील अनुसुचित जमातीकरीता ४४ पदे राखीव ठेवण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कळवण व सुरगाणा (जि. नाशिक) तालुक्यात जिओ (jio) कंपनीच्या फायबर ऑप्टीकल केबल टाकतांना महसूल विभागाची परवानगी घेतली नसल्याबाबत

(१९) ५६१५ (२७-०४-२०२५). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण व सुरगाणा (जि. नाशिक) तालुक्यात जिओ (jio) कंपनीच्या फायबर ऑप्टीकल केबल टाकताना महसूल विभागाची परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास उक्त कंपनीने शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडविला असून उक्त तालुक्यातील चांगल्या रस्त्यांचे खोदकाम केल्याने नागरिकांच्या दळणवळणाची गैरसोय झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :

(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

जिओ कंपनीमार्फत तहसिल कळवण व तहसिल सुरगाणा यांचे कार्यक्षेत्रामध्ये फायबर ऑप्टीकल केबल टाकण्याचे काम आजरोजी सुरू नाही.

तसेच, उप अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था नाशिक व सार्वजनिक बांधकाम विभाग, कळवण यांचेकडून जिओ डिजीटल फायबर प्रा.लि. नाशिक यांना सन २०२०-२१ मध्ये बोरगांव-सुरगाणा-उंबरठरण-बर्डीपाडा ते गुजरात सिमारोड, धुळपाडा-पळसन – आमदापळसन –बेंडवळ –भवाडा - राक्षसभुवन ते गुजरात सिमारोड या मार्गाने ऑप्टीकल केबल टाकणेकामी काही अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आली आहे.

भंडारा जिल्ह्यातील सामाजिक न्याय विभागाची मंजूर रिक्त पदे भरण्याबाबत

(२०) ६१०२ (२५-०४-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील सामाजिक न्याय विभागाच्या १८ मंजूर पदांपैकी पाच पदे भरण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागातील तेरा पदांचा अतिरिक्त कार्यभार वरिष्ठ पद रिक्त असल्याने या पदाची जबाबदारी अनेक निम्न दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ग एक व वर्ग दोन या स्थायी कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने जिल्ह्यातील नागरिकांना वेळेत काम होत नसल्याची तक्रार लोकप्रतिनिधींकडे वारंवार नागरिक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जात पडताळणी बहुजन विभागाचे कार्यालय समाज कल्याण विभागाचे कार्यालय हे एकाच विभागाच्या विभाग प्रभारीकडे कंत्राटी कर्मचाऱ्यांवर काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सामाजिक न्याय विभाग भंडारा येथील रिक्त पदे भरण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव संबंधित विभागाने सादर केला आहे का किंवा पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संजय शिरसाट (१८-०९-२०२५) :

(१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा या कार्यालयाकरीता १० पदे मंजूर असून, त्यापैकी ७ पदे भरलेली आहेत. तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा या कार्यालयाकरीता २० पदे मंजूर असून, त्यापैकी ०८ पदे भरलेली आहेत. सदर कार्यालयातील विशेष अधिकारी वर्ग-२ (शानिशा), सहायक लेखाधिकारी, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण निरीक्षक इ. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार प्रशासकीय कामकाज सुरळीत राहण्याच्या दृष्टीकोनातून व कामाची निकड लक्षात घेऊन कनिष्ठ दर्जाच्या अधिकारी /कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) होय, हे खरे आहे. समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सहायक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम गट-अ या संवर्गातील सरळसेवेच्या ४१ पदांच्या पदभरतीबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार सदर पदाच्या परीक्षा व मुलाखती पार पडल्या असून, पदभरतीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच समाज कल्याण अधिकारी, गट-ब या संवर्गातील सरळसेवेच्या २२ पदांच्या पदभरतीबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले होते. त्यानुसार लोकसेवा आयोगाने २२ उमेदवारांची समाज कल्याण अधिकारी, गट-ब या पदासाठी शिफारस केली असून, सदर उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

कनिष्ठ लिपीक संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील एकूण १०० पदे भरणेबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आलेले आहे. त्यापैकी ३७ उमेदवारांची निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, उर्वरीत ६३ पदे भरण्याची कार्यवाही लोकसेवा आयोगामार्फत सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील एकूण २१९ रिक्त पदे भरण्याबाबत समाज कल्याण आयुक्तालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नगर भूमापन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(२१) ६१०५ (२९-०४-२०२५). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर(जि.ठाणे) येथे नगर भूमापन कार्यालय असून सन १९८० या कालावधीमध्ये नगर भूमापन कार्यालयाने चौकशी केली असता त्यासुमारे ८० हजार मिळकतींना चालता क्रमांक देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी सुमारे ३२ हजार मिळकतींना अंतिम नगर भूमापन क्रमांक देण्यात आले असून अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे सुमारे ५० हजार मिळकतींना अद्यापही नगर भूमापन क्रमांक प्रलंबित असल्याने कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांच्याकडून नवीन सनद देण्याचे व यापूर्वीच्या सनद पडताळणीच्या आधारे फेरफार नोंदी करण्याचे काम सुरू असून नगर भूमापन कार्यालयाकडे सरासरी २५० ते ३०० फेरफारसाठी अर्ज प्राप्त होत असून सुमारे ८० ते ९० मोजणी अर्ज प्राप्त होत आहेत यासाठी या कार्यालयाकडे फक्त ४ परिक्षण भूमापक कार्यरत असल्याने नागरिकांची कामे प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूमापन कार्यालयातील कामाचे आवक जावक पाहता नवीन ३ पदे तयार

करणे आणि डेटा ऑपरेटर उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी संबधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नगर भूमापन कार्यालयातील उक्त रिक्त पदामुळे नागरिकाची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून खरेदी विक्री सनदच्या आधारे होत असल्याने नागरिकांना मिळकत पत्रिकेचे नगर भूमापन क्रमांकाबाबत माहिती व्हावी यासाठी भूमापन कार्यालयाने दोन पूर्ण वेळ जनसंपर्क अधिकारी नेमण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी करुन उक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :

(१) अंशत: खरे आहे, नगर भूमापन उल्हासनगर येथील मिळकतींच्या चौकशीचे काम सन १९८१ अखेर पूर्ण झाले असून, उल्हासनगर शहरासाठी चौकशीच्या वेळी ८२,३०३ मिळकतींना चालता क्रमांक देण्यात आले आहेत.

(२) अंशत: खरे आहे, चालता क्रमांक देण्यात आलेल्या ८२,३०३ मिळकतीपैकी ३०,२७८ मिळकतींना अंतिम नगर भूमापन क्रमांक देण्यात येऊन ५२,०२५ मिळकतींना फक्त चालता नंबर देण्यात आलेले आहेत. या विषयी मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ०३ मार्च, २०२५ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३)अंशत: खरे आहे, नगर भूमापन अधिकारी,उल्हासनगर या कार्यालयात परिरक्षण भूमापक संवर्गाची ४ पदे मंजुर असून ती भरलेली आहेत. नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर या कार्यालयात फेरफार व मोजणी प्रकरणात वाढ होत असल्याने अन्य कार्यालयातील परिरक्षण भूमापक संवर्गातील १ कर्मचारी यांची सेवा नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर कार्यालयात वर्ग करण्यात आलेली आहे. वाढ झालेल्या कामाचा निपटारा करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही, तथापि,नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर या कार्यालयास २ डेटा ऑपरेटर कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(५)हे खरे नाही,नगर भूमापन अधिकारी, उल्हासनगर कार्यालयात प्रमुख लिपिक संवर्गातील माहितगार कर्मचाऱ्याची जनसंपर्क अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील व मराठवाडा विभागातील गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत.

(२२) ७०५५ (२९-०४-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील व मराठवाड्यातील अनुसुचित जाती, जमाती व भूमीहीन शेतमजूर यांनी केलेले सरकारी व गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यात यावे यासाठी वंचित हक्क आंदोलक महाराष्ट्र राज्य शाखा, मुखेड यांनी जिल्हाधिकाऱ्यामार्फत शासनास मागणीचे निवेदन सादर केल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील निजाम राजवटीपासून सरकारी गायरान जमीन अन्नधान्य पिकविण्यासाठी अनुसुचित जातीच्या लोकांना वाटप केल्या होत्या व सदर जमिनी सन १९५३ पर्यंत मराठवाड्यातील दलिताच्या ताब्यात असल्याची सरकारी दप्तरी नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०८-२०२५) : (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

जामनगर (गुजरात) येथे "वनतारा" या प्राणी संग्रहालयाच्या धर्तीवर राज्यातही "वन्यजीव संग्रहालय" उभारण्याबाबत

(२३) ७३७१ (२०-०७-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनगर (गुजरात) येथे रिलायन्स समूहाने उभारलेल्या 'वनतारा' या प्राणीसंग्रहालयाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातही 'वन्यजीव संग्रहालय' उभारण्याबाबत विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील वाढते शहरीकरण, जैवविविधतेतील घट आणि वन्यजीवांच्या अधिवासावर होणारे अतिक्रमण, यामुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर असून, वैज्ञानिक संशोधन, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरण शिक्षणासाठी 'वनतारा' सारख्या संग्रहालयांची गरज निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस वाढत असून, जखमी वा विस्थापित प्राण्यांच्या पुनर्वसन व उपचारासाठी सुसज्ज सुविधा नसल्याने पर्यावरणीय समतोल बिघडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यादृष्टीने शासनाच्या शिष्टमंडळाने गुजरातमधील 'वनतारा' प्रकल्पाला भेट दिली आहे काय व त्यानुसार ठाणे जिल्ह्यात संभाव्य प्रकल्पासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्पासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (०४-०९-२०२५) : (१) राज्यात केंद्रिय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या मान्यतेने गोरेवाडा नागपूर, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली, माणिकडोह बिबट निवारा केंद्र, जुन्नर विभाग इत्यादि ठिकाणी वन्यप्राणी बचाव केंद्र कार्यरत आहे. त्यांना अद्यावत करण्याची प्रक्रिया सतत सुरु आहे. राज्यात ठाणे, पुणे व छत्रपती संभाजीनगर वनवृत्तात वनताराच्या धर्तीवर सुसज्ज वन्यप्राणी बचाव केंद्र उभारण्याबाबत तपासणी सुरू करण्यात आलेली आहे.
(२) व (३) राज्यात वाढते मानव वन्यजीव संघर्षाची स्थिती पाहता वन्यजीव (संरक्षण) अधिनियम-१९७२ नुसार कलम-११ अन्वये मानवी जिवितास धोकादायक ठरत असलेले वन्यप्राणी जेरबंद करण्याचे प्रमाण वाढत असल्याने सुसज्ज वन्यजीव व बचाव केंद्र उभारण्याची गरज निर्माण झालेली आहे व त्यासाठी अस्तित्वात असलेले वन्यप्राणी बचाव केंद्र अद्यावत करण्याची किंवा आवश्यकतेनुसार नवीन बचाव केंद्र निर्माण करण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.
(४) "वनतारा" प्राणी बचाव, संवर्धन व पुनर्वसन केंद्र येथे शासन पत्र क्र. डब्ल्युएलपी-०८.२५/प्र.क्र.२०१/ फ-१, दिनांक ०७.०८.२०२५ अन्वये १३ अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण दौरा कार्यक्रमास मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच वनतारा वन्यप्राणी केंद्रासारखे केंद्र उभारण्यासाठी संभाव्य जागा निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे. परंतु, अद्याप संभाव्य जागा निश्चित करण्यात आलेली नाही.
(५) व (६) अस्तित्वात असलेले वन्यप्राणी बचाव केंद्र अद्ययावत करणेबाबत व आवश्यकतेनुसार नवीन बचाव केंद्र उभारण्याबाबत प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण यांचेकडे प्रस्ताव पाठवून रितसर मंजूरी प्राप्त करण्याची तजवीज ठेवली आहे.

महसूल विभागातील प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती स्थापना करण्याबाबत

(२४) ७५४९ (२०-०७-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागातील प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती अशा एकूण सहा अभ्यास समित्यांची स्थापना करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या समित्यांची कार्यपद्धती काय असणार आहे, तसेच समित्यांनी अंमलबजावणीसाठी कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, समित्यांनी दिलेल्या शिफारशींबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे. राज्य शासनाच्या धोरणात्मक योजनांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व प्रतिक्रिया समाविष्ट करून कार्यक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली १ अशा एकूण ६ समित्या दिनांक ०९.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आल्या आहेत.

(२) आणि (३) सहा विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलल्या समित्यांची कार्यपध्दती पुढील प्रमाणे -

१) समिती क्र. १: अध्यक्ष - विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग

विषय :- महसूल प्रशासनाच्या अध्यक्षतेखाली गठीत विविध समित्यांचा आढावा घेऊन सुसुत्रीकरण करणे.

२) समिती क्र.२: अध्यक्ष विभागीय आयुक्त, अमरावती विभाग

विषय :- विविध संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचे कामकाजाकरीता Key Performance Indicators KPIs निश्चित करणे.

३) समिती क्र.३: अध्यक्ष - विभागीय आयुक्त, नागपूर विभाग

विषय :- उत्कृष्ट कार्यपध्दतींचे एकत्रिकरण करणे व त्या राज्यभर विस्तारक्षम करणे.

४) समिती क्र. ४ : अध्यक्ष - विभागीय आयुक्त, पुणे विभाग

विषय:- नागरिकांचे जीवनमान सुकर करणेबाबत उपाययोजना.

५) समिती क्र.५: अध्यक्ष विभागीय आयुक्त, कोकण विभाग

विषय :- जिल्हा नियोजन समित्या परिणामकारक करणे.

६) समिती क्र. ६ : अध्यक्ष - विभागीय आयुक्त, नाशिक विभाग

विषय :- महसूल विभागाच्या अस्तित्वात असलेल्या संरचनेचा अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा करणे.

सदर ६ समित्यांनी दिलेला अहवाल शासनास प्राप्त झाला असून शिफारशींची अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शिफारशी तपासण्याची कार्यवाही सुरू आहे.

४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरपना (जि.चंद्रपूर) येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय स्थापन करण्याबाबत

(२५) ८०७२ (२०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजी मा.प्रधान सचिव, महसूल विभाग यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०८-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दिनांक १०.०३.२०२५ मध्ये निवेदन प्राप्त झाले आहे, ही बाब खरी आहे. सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून दिनांक २४.०१.२०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये आवश्यकतेनुसार नवीन कार्यालये निर्मितीबाबत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावांचे अवलोकन करुन पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भूमि अभिलेख कार्यालयातून मोजणी नकाशे जोडल्याशिवाय मुद्रांक कार्यालयात जमीन व्यवहार नोंदवले जाणार नसल्याबाबत

(२६) ८२४७ (२०-०७-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूमि अभिलेख कार्यालयातून मोजणी नकाशे जोडल्याशिवाय मुद्रांक कार्यालयात जमीन व्यवहार नोंदवले जाणार नाहीत अशी अट घालण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन खरेदी विक्री संबंधीच्या सन १९०८ च्या कायद्यात बदल झाल्यामुळे राज्यातील जमीन खरेदी विक्री व्यवहार ठप्प झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कायदयात बदल करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०८/०८/२०२३ अन्वये बागायती क्षेत्रासाठी १० आर व जिरायत क्षेत्रासाठी २० आर असे प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे नोंदणी अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या मिळकतींची खरेदी-विक्री करता येत नाही, प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राच्या खरेदी-विक्री व्यवहारांच्या दस्तांसोबत सक्षम प्राधिकारी यांचे परवानगी आदेश अथवा मंजूर केलेला हद्द कायम केलेला नकाशा सादर केल्यास दस्त नोंदणी करण्यात येते. सदर सुधारणा आल्यानंतर माहे मे २०२५ मध्ये २,६५,१३० इतकी दस्त नोंदणी झाली आहे. तर मागील वर्षी याच कालावधीत माहे मे २०२४ मध्ये २,६२,५२२ इतकी दस्त नोंदणी झाली होती. त्यामुळे गुंठ्यातील शेतीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहारावर व दस्त नोंदणीवर परिणाम झालेला नाही.
(३) केंद्रीय अधिनियमांव्दारे किंवा राज्य अधिनियमाव्दारे मनाई केलेल्या संव्यवहारांशी संबंधित असणाऱ्या विवक्षित दस्तऐवजांची, निष्पादित केलेला सांविधानिक अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य व्यक्तीने, कोणत्याही केंद्र किंवा राज्य शासनांची किंवा कोणत्याही प्राधिकरणाची किंवा उपक्रमाची मालकी असणाऱ्या मालमत्तेचे हस्तांतरण करण्याच्या उद्देशाने, विक्री करारपत्र, विक्री खत, बक्षीसपत्र, विनिमय पत्र किंवा भाडेपट्टा विलेख, इत्यादींची नोंदणी करण्यास नकार देण्याची तरतूद करण्यासाठी अन्य राज्यांनी केलेल्या सुधारणांच्या धर्तीवर नोंदणी अधिनियम, १९०८ मध्ये नवीन कलम १८ क समाविष्ट करण्यात आले आहे.

मालमत्तेचे वर्णन व नोंदणीसाठी दस्तऐवज स्वीकारण्यासाठी मालमत्तेची पुरेशी ओळख पटविण्यासाठी जोडण्यात येतील अशी कागदपत्रे व दस्तऐवज नियमांव्दारे विहित करण्यासाठी राज्य शासनास अधिकार प्रदान करण्याच्या दृष्टीने कलम २१ मध्ये व परिणामस्वरूप कलम २२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

केज (जि. बीड) तालुक्यातील वस्त्यांचे महसूली गावात रुपांतर करण्याबाबत

(२७) ८२५८ (२०-०७-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील मूळ महसूली गावाच्या गावठाणाच्या हद्दीबाहेरील किमान ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या एकूण १२ वस्त्याचे महसूली गावात रुपांतर करण्याची अंतिम अधिसूचना काढण्यात आली आहे, परंतु त्यावर अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महसूली गावात रुपांतर करण्याच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०८-२०२५) :

(१) अंशत: खरे आहे. जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्या दिनांक २८.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये महसुली दर्जा देण्यात यावयाच्या एकूण १२ गावांची ग.नं./स.नं निहाय माहिती संकलित करण्यात येत असून त्यापुढील कार्यवाही करण्यात येत आहे असे कळविले आहे.

(२) व (३) होय खरे आहे. दिनांक १९.०५.२०२५ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले असून याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २८.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील मौजे व्यारावली सर्व्हे नं.९ ह्या जागेवर मोठ्या प्रमाणावर डोंगर खोदून वहिवाटाचा रस्ता बंद केल्याबाबत

(२८) ८३१४ (१९-०८-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मौजे-व्यारावली (जोगेश्वरी पूर्व) न.भू.क्र.१ (पै) सर्वे नं.९ ह्या जागेवर मोठ्या प्रमाणावर डोंगर खोदून शासकीय जागेवर पोहचण्याचा मार्ग बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वहिवाटीचा रस्ता बंद करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०२५) : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका यांची बांधकाम परवानगी व दिनांक ०४.०८.२०२१ रोजी मंजूर इमारत आराखडानुसार मौजे व्यारवली न.भु.क्र.१ पै. सर्व्हे क्र.९ यावर नवीन प्रकल्पाचे काम सुरू आहे. मौजे व्यारावली येथील नगर भुमापन क्रमांक १/१ या भुखंडालगत उत्तरेस नगर भुमापन कोंदिवटा येथील नगर भुमापन क्रमांक ५९४ हा शासकीय मिळकतीचा असून, सध्या तेथे खोदकाम सुरू असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव पायवाट बंद आहे. या शासकीय भुखंडाकडे जाण्याकरीता जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड लगत नगर भुमापन मजास मधुन

डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड या नावाने नगर भुमापन क्रमांक ५९४ या शासकीय भुखंडाकडे व त्या लगत असलेल्या झोपडपट्टीस पर्यायी रस्ता जागेवर उपलब्ध आहे.
(३) व (४) मा.लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २८.०१.२०२५ च्या पत्राच्या अनुषंगाने, तहसिलदार, अंधेरी यांनी दिनांक १३.०२.२०२५ रोजी स्थळपाहणी वेळी सदर भुखंडातून गौण खनिजाचे मेजर टेपच्या सहाय्याने मोजमाप केले असुन त्यामध्ये ४१,२०९ ब्रास गौण खनिज उत्खनन केले असल्याचे आढळून आले आहे. सदर भूखंडातून ०१,२५,००० ब्रास गौण खनिज उत्खनन करीता वेळोवेळी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी परवानगी दिली आहे.
(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

परभणी शहर व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र तहसील कार्यालय स्थापन करण्याबाबत

(२९) ८४११ (२०-०७-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहर व ग्रामीण परिसरातील गावांची संख्या, लोकसंख्या व इतर निकष पूर्ण होत असल्याने परभणी शहर व परभणी ग्रामीण यासाठी स्वतंत्र अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०२५ मध्ये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत अपर मुख्य सचिव, महसूल यांना आदेशित केले होते काय, तसेच किती मुदतीत नवीन अपर परभणी शहर तहसील कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मागील दहा वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रकरणावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०२५) : (१), (२) व (३) हे खरे आहे. सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून दिनांक २४.०१.२०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये आवश्यकतेनुसार नवीन कार्यालये निर्मितीबाबत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावांचे अवलोकन करुन पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सन २०२५ मध्ये निवेदन प्राप्त झाले आहे, ही बाब खरी आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मातंग समाजाने अनुसूचित जातीतील आरक्षणाचे अबकड स्वरुपात वर्गीकरण करण्याच्या केलेल्या मागणीबाबत

(३०) ८५७३ (२०-०७-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील आझाद मैदानावर मातंग समाजाच्या विविध संघटनांच्या वतीने मंत्रालयावर ‘महाआक्रोश मोर्चा’ दिनांक २० मे, २०२५ रोजी काढण्यात आला असून, या मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुसूचित जातीमधील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी ‘अबकड’ स्वरूपात आरक्षणाचे वर्गीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ‘अबकड’ आरक्षण वर्गवारीची मागणी लक्षात घेता, शासनाने त्यासंदर्भात समिती गठित केली आहे काय, असल्यास तिची कार्यपद्धती काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मागण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संजय शिरसाट (१५-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णय,

दिनांक१५.१०.२०२४ अन्वये मा.न्या.श्री.अनंत मनोहर बदर (से.नि.),मा.उच्च न्यायालय, पाटणा यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून त्यान्वये सदर समितीची कार्यकक्षा सुनिश्चित करण्यात आली आहे. सदर समितीस शासन निर्णय, दिनांक०४.०३.२०२५ अन्वये दिनांक१४.०९.२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. प्रस्तुत विषयी समितीस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तृतीयपंथी यांच्या कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना करण्याबाबत

(३१) ८८०६ (२१-०७-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तृतीयपंथी यांच्या हक्कांचे संरक्षण अधिक सक्षमतेने आणि प्रभावी होण्यासाठी शासन राज्यातील तृतीय पंथीयांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत असून यासाठी कल्याणकारी मंडळाची स्थापनाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीय समुदायाच्या शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या संदर्भातील विविध योजना राबविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तृतीयपंथीयांसाठीचे धोरण, दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी जाहीर करण्यात आले असून, या धोरणानुसार राज्यस्तरीय मंडळाच्या संरचनेत सुधारणा करण्यात येणार आहेत काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तृतीयपंथीयांच्या कल्याण मंडळाची पुनर्रचना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संजय शिरसाट (१५-०९-२०२५) :(१) होय.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन निर्णय, दिनांक ११ मार्च,२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाच्या संरचनेत सुधारणा करून नव्याने प्रादेशिक विभागांतर्गत शिक्षण/सामाजिक क्षेत्रात क्रियाशील असलेली तृतीयपंथी व्यक्ती (प्रत्येक विभागातील एक) सदस्य ६ समाविष्ट करण्यात आले आहेत.
(४) महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाच्या सुधारीत संरचनेनुसार शासन निर्णय, दिनांक ३.४.२०२५ आणि दिनांक १६.४.२०२५ अन्वये सह उपाध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी बांधवासाठी सुरु असलेली खावटी अनुदान योजना बंद केल्याबाबत

(३२) ९०६९ (०८-०९-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी बांधवासाठी यापूर्वी सुरु असलेली खावटी अनुदान योजना बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी बांधवांसाठी महत्त्वाची असलेली योजना पुन्हा नव्याने सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाची भूमिका काय आहे व याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (११-०९-२०२५) : (१) (२) व (३) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येणारी खावटी कर्ज योजना सद्यास्थितीत कार्यान्वित नाही. तथापि, शासनाच्या मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी दिव्यांग, विधवा, निवृत्तीवेतन अनुदान योजना, मोफत अन्नधान्य वाटप योजना इत्यादी योजनांमधून अनुसूचित जमातीतील लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मानखुर्द शिवाजीनगर क्षेत्राच्या विकासाकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनातंर्गत विकास करण्याबाबत

(३३) ९२९९ (२०-०७-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द शिवाजीनगर क्षेत्राच्या विकासाकरिता 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना' अंतर्गत माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान क्षेत्राच्या विकासाकरिता निधी उपलब्ध करण्याचे निदेश दिले असतानाही संबंधित विभागाकडून निधी मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिकांना विविध समस्याला सामोरे जावे लागत असल्याने विभागाच्या विकासकार्याकरीता मंजूर करण्यात आलेला निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त निधी मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१९-०९-२०२५) : (१) हे खरे नाही. दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मानखुर्द शिवाजीनगर क्षेत्राच्या विकासाकरिता निधी उपलब्ध करण्याचे निदेश प्राप्त झालेले नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत

(३४) ९३६७ (१९-०८-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे विभाजनाच्या कार्यवाहीस्तव विचारात घेण्यात आल्याचे सन २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त जिल्ह्याच्या विभाजनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०२५) :(१)नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्याच्या प्रलंबित त्रिविभाजनाबाबत

(३५) ९४५० (२०-०७-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुका हा सर्वाधिक विस्तार क्षेत्रफळ असलेला दुष्काळी तालुका असून सदर तालुक्याचे क्षेत्रफळ अधिक असल्यामुळे प्रशासकीय कामात विलंब होऊन शासकीय अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून नागरिकांच्या कामास विलंब लागत असल्यामुळे उक्त तालुक्याची त्रिविभाजनाची मागणी अनेक वर्षापासून स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विषय मार्गी लावण्याबाबत दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजी तत्कालीन महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या दालनात बैठक आयोजित करून मा.मंत्री महोदयांनी पुढील कार्यवाही करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित करूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्याच्या प्रलंबित त्रिविभाजनाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये शासनाकडे पुन:श्च लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तालुक्याच्या प्रलंबित त्रिविभाजनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :
(१) जत तालुक्याची त्रिविभाजनाची मागणी अनेक वर्षापासून स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे.
(२) दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये तत्कालीन महसुल मंत्री महोदयांनी शिष्टमंडळाने जत तालुक्याच्या त्रिविभाजनाबाबत अथवा अन्य अपर तहसील कार्यालय निर्माण करणेबाबत दांगट समितीशी चर्चा करुन व वेळ घेवून निवेदन सादर करावे. दांगट समितीने सदर मागणी तपासुन त्यांच्या एकत्रित अहवालात या मागणीचा परामर्श घेवून अहवाल शासनास सादर करावा असे निदेशित केले होते. तथापि, सदर समिती दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बरखास्त करण्यात आली आहे.
(३), (४) व (५) हे खरे नाही, नवीन तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून याबाबत मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित करण्यात आलेले नाही.

खंबाळे (ऑक्सिजन पार्क) व पारे (दरगोबा मंदिर) (ता.खानापूर, जि.सांगली) येथे निसर्ग पर्यटन विकास योजनेंतर्गत निधी मिळण्याबाबत

(३६) १०२०४ (२१-०७-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खंबाळे (ऑक्सिजन पार्क) व पारे (दरगोबा मंदिर) (ता.खानापूर, जि.सांगली) हे वन विभागाच्या पर्यटनासाठी महत्वाचे परिक्षेत्र आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पर्यटन वाढीच्यादृष्टीने निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने मंत्री महोदयांकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन त्यानुसार पर्यटकांच्या सोयीसाठी व पर्यटन वाढीच्या दृष्टीनेनिधी मंजूर करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (१४-०८-२०२५) : (१), (२) व (३) मौजे खंबाळे येथील ऑक्सीजन पार्क पर्यटनस्थळाचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केल्यानुसार पर्यटकांच्या सोईनुसार करावयाच्या कामांचे आराखडयास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ नागपूर यांच्या दिनांक ०५.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये तत्वतः मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेनुसार आराखडा सुधारित करुन अंतिम मान्यतेसाठी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत आहे. तसेच पारे दरगोबा मंदिर निसर्ग पर्यटन आराखडा तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील गायरान जमीन वापराबाबत

(३७) १०३२७ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने SLP -११३२/२०११ मध्ये गायरान जमीन वापराबाबत दिलेले निर्देश जिल्हाधिकारी, पुणे यांच्या मार्फत सन १९९६ ते १९९९ दरम्यानच्या शासन निर्णयाचा वापर करून गायरान जमीनीचा दर्जा कमी करून सदर जमीन म्हाडा आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण नगरपरिषद हद्दीत गट नंबर ८१८ ही गायरान जमीन दर्जा कमी करून म्हाडा व प्रधानमंत्री आवास योजना यांना देण्यात आली असून त्याच धर्तीवर रोहकल येथील गायरान जमीन देखील म्हाडा प्राधिकरण यांना हस्तांतरण करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडा आणि प्रधानमंत्री आवास योजना ह्या SLP ११३२/२०११ चे निर्देशाचे अन्वयार्थ लावल्यास सार्वजनिक प्रयोजनाअंतर्गत येत नसून व्यक्तिगत लाभात येतात, हे ही खरे आहे काय,

४) असल्यास, गायरान जमीन म्हाडा व प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दिल्याने गावाच्या सार्वजनिक प्रयोजनासह नागरिकांच्या निवडीच्या सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-११-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) मौजे चाकण ता. खेड जि. पुणे येथील जमीन ग. नं. ८१८ वरील एकुण क्षेत्र ६ हे ४३ आर पैकी विरशैव समाज स्मशानभूमी साठी क्षे. ० हे. २० आर क्षेत्र हे उपविभागीय अधिकारी जुन्नर, उपविभागखेड, यांचे आदेश दिनांक२६/०४/२००५ नुसार फेरफार क्रमांक ७६४२ अन्वये वाटप करणेत आले आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र

विकास प्राधिकरण (म्हाडा) पुणे यांस २ हे. ०० आर क्षेत्र जिल्हाधिकारी, पुणे यांचे दिनांक०२/०८/२०१७ चे आदेशानुसार फेरफार क्रमांक १४२६६ अन्वये वाटप करणेत आले आहे. मुख्याधिकारी चाकण नगर परिषद यांना २ हे. ०० आर क्षेत्र जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेश दिनांक १७/१२/२०१८ नुसार फेरफार क्रमांक १४६३९ अन्वये प्रधान मंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे योजने अंतर्गत वाटप केले आहे. जिल्हाधिकारी पुणे यांचे दिनांक१२/६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०० चे अंतर्गत पुणे मंडळास (म्हाडा) गृहनिर्माणासाठी मौजे रोहकल येथील जमीन गट २२० मधील १५ हे. ४६ आर क्षेत्र वाटप करण्यात आलेले आहे. तसेच गट नं. २२० मध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत गट विकास अधिकारी पंचायत समिती खेड यांचेकडून २१ लाभार्थ्यांकरीता घराकूलासाठी व अंगणवाडी केंद्र, समाजमंदिर, पाण्याची टाकी व इतर आवश्यक बाबींसाठी दिनांक१६/०६/२०२५ अन्वये २१ लाभार्थ्यांकरीता मौजे रोहकल येथील जमीन गट नं.२२० मधील १०.५० आर चौ. मी .क्षेत्र वाटप करणेत आले आहे.

(३) हे खरे नाही. ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. प्रआयो २०२१/प्र.क्र.८१ /योजना१०दिनांक२२/०८/२०२२ मधील मुद्दा क्र. ५ नुसार प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण व राज्य शासन पुरस्कृत आवास योजना) या सार्वजनिक प्रयोजन असलेचे नमूद केले आहे. सदर प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेली जमीन ही संबधित मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे व मुख्याधिकारी, नगर परिषद चाकण यांचे नावे जागा प्रदान आदेश पारित करण्यात आलेले असून त्यांनी पात्र लाभार्थ्यांना भाडेपट्टयाने देण्यात येणार आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि.पुणे) चाकण येथे अपर तहसील कार्यालय सुरु करण्याबाबत

(३८) ११११५४ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील वाढत्या लोकसंख्येचा आणि प्रशासकीय गरजांचा विचार करता शासनाला माहे मार्च, २०२५ मध्ये दिलेल्या अपर तहसील प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे,

(२) असल्यास, या प्रस्तावात फायदा होणाऱ्या गावातील रहिवाश्यांची संख्या आणि दळणवळण सुविधा यामुळे होणारी प्रशासकीय सोय पाहता, शासन करंजविहीरे महसूल मंडळाचा अप्पर तहसील प्रस्तावात समावेश करण्याचा विचार करेल काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त प्रस्ताव मंजूर करुन नागरिकांच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन उक्त प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०२५) : (१) अनुषंगाने प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन करुन पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रस्तावित करण्यात आलेल्या अपर तहसील कार्यालयाचे कार्यक्षेत्र, वाढते नागरिकीकरण, वाढते औद्योगिकीकरण, तेथील नागरिकांचे प्रश्न व प्रशासकीय कामाचा ताण पाहता करंजविहीरे मंडळ हे मूळ खेड तहसील कार्यालयाचे कार्यक्षेत्रात ठेवणे संयुक्तिक राहील.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील खदान व क्रशर यांच्या नुतनीकरणाबाबत

(३९) ११३४६ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड व शिरूर (जि.बीड) तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागामध्ये खदान व क्रशर यांचे नुतनीकरण माहे मार्च, २०२५ मध्ये झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुतनीकरण होत असताना संबंधितांकडून शासकीय महसूलाची सर्व थकबाकी विभागाने भरून घेणे बंधनकारक असताना ती घेतली आहे किंवा नाही, यांची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी बीड, अपर मुख्य सचिव महसूल विभाग, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त खदान व क्रशर याची तपशीलावर माहिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणामधील खदान व क्रशर यांचे नुतनीकरण व शासकीय महसुल वसुली बाबतची माहिती जिल्हाधिकारी बीड यांच्या दिनांक २८.०८.२०२५ च्या पत्रान्व्ये मा. विधानसभा सदस्य यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

इचलकरंजी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीपात्रातील वाळू उपसा काढण्यास परवानगी मिळण्याबाबत

(४०) ११४६२ (१९-०८-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील पंचगंगा नदीपात्रातील वाळू उपसा मागील अनेक दिवसांपासून काढण्यात न आल्याने पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर परिस्थितीवरील प्रतिबंधात्मक उपाय व पाणी टंचाईवरील उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून पंचगंगा नदीपात्रातील १० गटांमध्ये गाळ व गाळमिश्रित वाळू उपसा करण्यासाठी ऑनलाईन निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करण्यासाठी शासनाच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या धोरणानुसार मान्यता देण्यात यावी, अशी मागणी अपर मुख्य सचिव (ख), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी माहे मार्च, २०२५ मध्ये प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने नदीपात्रातील गाळ व गाळमिश्रित वाळू उपसा काढण्यास परवानगी देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०९-२०२५) : (१) होय अंशत: खरे आहे.
नदीतील गाळ, गाळ मिश्रित वाळू काढून नदीची वहनक्षमता पुनःस्थापित करण्याच्या अनुषंगाने जलसंपदा विभागामार्फत दिनांक २५.०७.२०२३ व दिनांक १५.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तांत्रिक मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार चंदूर ते काळा ओढा, इचलकरंजी या दरम्यान अंतरिम पूर रेषा मंजूरी, गाळ काढण्यासाठी नदीची लांबी निश्चित करणे व नदी उतारास मान्यता घेणे यासाठी जलसंपदा विभागाच्या अधिक्षक अभियंता, कोल्हापूर विभाग यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(२) होय.
(३) दिनांक १६.०२.२०२४ रोजीचे शासनामार्फत वाळू/ रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्रीबाबतचे धोरण दिनांक ०८.०४.२०२५ च्या "वाळू रेती निर्गती धोरण-२०२५" अन्वये अधिक्रमीत केले असून मा. हरीत लवाद, चेन्नई यांचे आदेश विचारात घेता, नवीन धोरणामध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनार्थ गाळ मिश्रीत वाळू

उत्खनन करण्याची तरतूद करण्यात आलेली नाही.त्यामुळे इचलकरंजी ता. हातकणंगले येथील पंचगंगा नदीपात्रातील गाळ गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी ऑनलाईन निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करण्याची जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची विनंती अमान्य केली आहे.
४) सदर प्रकरणी जलसंपदा विभागामार्फत दिनांक २५.०७.२०२३ व दिनांक १५.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार नदीची वहन क्षमता पुनःस्थापित करताना निघालेला गाळ, माती, माती मिश्रित वाळू व वाळूची विल्हेवाट कशा प्रकारे लावावी याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिनांक २३.०५.२०२५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

खापरखेडा (जि.नागपूर) परिसरात लाल माती व सिमेंटविटा विक्रीचा गैरव्यवहार सुरु असल्याबाबत

(४१) ११९३४ (१९-०८-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खापरखेडा (जि.नागपूर) येथील भानेगाव व वारेगाव शिवारात विटांचे खाजगी स्टॉल (दुकाने) तयार करुन लाल माती व सिमेंटविटा विक्रीचा गैरप्रकार सुरू असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम मटेरिअल विक्रेते वीटभट्टी मालकांच्या दुर्लक्षामुळे विटांची चोरी व अवैधरित्या बांधकाम सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०९-२०२५) : (१) सावनेर तालुक्यातील भानेगांव शिवारात लाल माती व सिमेंटच्या तयार असलेल्या विटा इतर दुस-या ठिकाणावरून आणुन खाजगी स्टॉल (दुकाने) विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मौजा वारेगाव हे गाव कामठी तालुक्यात येत असुन मौजा वारेगाव शिवारात विटांचे खाजगी स्टॉल (दुकाने) तयार करुन लाल माती व सिमेंटविटा विक्रीचा गैरप्रकार सुरु असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) व (३) बांधकाम मटेरिअल विक्रेते वीटभट्टी मालकांच्या दुर्लक्षामुळे विटांची चोरी व अवैधरित्या बांधकाम सुरु असल्याची तक्रार प्राप्त नाही. तथापी, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून सावनेर तालुक्यातील भानेगाव शिवारात लाल मातीचे उत्खनन करून विटभट्टी लावून विटा तयार करीत नसल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

खानापूर (जि.सांगली) येथील तलाठी कार्यालयांच्या इमारती मोडकळीस आल्याबाबत

(४२) १२१२६ (२०-०७-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि.सांगली) येथील तलाठी कार्यालयाची इमारत अत्यंत जिर्ण झाली असून मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी सुसज्ज अशी नवीन इमारत बांधून देण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०९-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. तथापि, ज्या ठिकाणी तलाठी कार्यालये उपलब्ध नाहीत, अशा ठिकाणच्या स्थानिक नागरिकांकडून मागणी करण्यात आलेली आहे.

(३) खानापूर तालुक्यातील एकूण ३६ सजांपैकी १३ तलाठी कार्यालयांचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडे जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडून मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले होते. त्यापैकी मौजे लेंगरे, ता. खानापूर येथील मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालय आणि मौजे नागेवाडी ता. खानापूर येथील तलाठी कार्यालयासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

उर्वरित ११ प्रस्तावांना त्रुटी/निधीअभावी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नेकनूर (ता.जि, बीड) येथे अपर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याबाबत

(४३) १२४६७ (२०-०७-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर (ता.जि.बीड) येथे शासनाने अपर तहसील कार्यालय प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेकनूर हे राष्ट्रीय महामार्गावरील लोकसंख्येचे मोठे गाव असून सदर ठिकाणी आजूबाजुच्या ५० गावांचा संपर्क असल्यामुळे प्रस्तावित अपर तहसील कार्यालय कार्यान्वित करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ३ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०८-२०२५) : (१), (२) व (३) हे खरे आहे. सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून दिनांक २४.०१.२०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये आवश्यकतेनुसार नवीन कार्यालये निर्मितीबाबत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावांचे अवलोकन करून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून दिनांक ०३.०६.२०२५ रोजी निवेदन प्राप्त झाले, ही बाब खरी आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील डोंगरी भागात अवैध उत्खनन करून इमारती उभारण्यात येत असल्याबाबत

(४४) १२९८० (१९-०८-२०२५). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील खडक पाडा डोंगरी भागात अवैध उत्खनन करून इमारती उभारण्यात येत असून महसूल विभागाकडून दुर्लक्ष करीत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पश्चिम खडक पाडा भागात डोंगर उत्खनन होत असल्याने याठिकाणाच्या इमारतींना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त डोंगर भागात अवैध उत्खननासंदर्भात तहसीलदार कल्याण यांनी चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०९-२०२५) : (१),(२) व (३) मौजे गंधारे, ता.कल्याण, जि.ठाणे येथील ग.नं.१५/४/२ या क्षेत्रावर संबंधित विकासकास बांधकाम करणेकामी कल्याण डोंबीवली महानगरपालिका यांचे दिनांक ०८.१०.२०२४ च्या आदेशान्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देणेत आले आहे. महानगरपालिकेने बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर सदर क्षेत्रात तहसिलदार, कल्याण यांचेकडून दिनांक १३.११.२०२४ ते दिनांक १३.०५.२०२५ याकालावधीत ४००० ब्रासचे स्वामित्वधन भरणा करून गौणखनिज उत्खनन व वाहतूक परवानगी देण्यात आलेल्या आहेत.

कल्याण पश्चिम, खडकपाडा, डोंगरी भागात अवैध उत्खनन करून इमारती उभारण्यात येत असलेबाबत या मथळ्याखाली दिनांक १६.०१.२०२५ रोजी स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली त्यानुषंगाने तहसिलदार, कल्याण यांनी दिनांक २०.०१.२०२५ रोजी केलेल्या चौकशीत मौजे गंधारे, ता.कल्याण, जि.ठाणे येथील ग.नं.१५/४/२ या क्षेत्रावर उत्खनन सुरू असल्याचे आढळून आले व त्यामध्ये १७७२ ब्रास उत्खनन झाल्याचे दिसून आले. तसेच, संबंधितांनी गौणखनिज उत्खननास परवानगी घेतली असल्याचे निदर्शनास आले.

तथापि सदर उत्खननामुळे कल्याण पश्चिम खडकपाडा भागात या ठिकाणाच्या इमारतींना धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) व (५) प्रश्नच उद्भवत नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत

(४५) १३०१८ (२१-०७-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरु करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरीक, विविध सामाजिक संघटनांसह लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०८-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सन २०२५ मध्ये निवेदन प्राप्त झाले आहे, ही बाब खरी आहे.
सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून दिनांक २४.०१.२०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये आवश्यकतेनुसार नवीन कार्यालये निर्मितीबाबत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावांचे अवलोकन करुन पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

खापरखेडा (ता.सावनेर,जि.नागपूर) येथील ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड झाल्याबाबत

(४६) १३२५६ (१९-०८-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास रेती मोफत देण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खापरखेडा (ता.सावनेर) येथील ग्राम महसूल अधिकारी घरकूल लाभार्थ्यांना रेतीचे वितरण करीत असतांना अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या दोन वाहनांची तोडफोड केल्याचे दिनांक २१ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन,खापरखेडा येथे दिनांक २४.०५.२०२५ रोजी गु.र.क्र.०३८८/२०२५ भारतीय न्याय संहिता (वी.एस.एस),२०२३ चे कलम १३२, २२१, २२४ व ३२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
संबंधित दोषीविरुध्द पोलीसांमार्फत स्टेशन मार्फत चौकशीची कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

भोकर (जि.नांदेड) येथे आदिवासी बहुल गावांचा समावेश आदिवासी क्षेत्रामध्ये करण्याबाबत

(४७) १३२७१ (२१-०७-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) येथे स्थानिक प्रशासनाच्या नोंदीनुसार ३३ आदिवासी बहुल गावांचा समावेश आदिवासी क्षेत्रामध्ये करण्याकरीता केंद्र शासनाकडे शिफारस करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (२२-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) , (३) , (४) महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे. अनुसूचित क्षेत्रात समावेश करण्यासाठी विहित केलेले निकष पुढीलप्रमाणे आहेत,

१) अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे प्राबल्य असणारी गावे,
२) प्रस्तावित क्षेत्र सलग असावे. तसेच, त्या क्षेत्राचा आकार वाजवी स्वरुपाचा (Sizeable) असावा.
३) प्रस्तावित क्षेत्राचे अस्तित्व प्रशासन योग्य असावे. जिल्हा, तालुका किंवा ब्लॉक इत्यादी.
४) प्रस्तावित क्षेत्रातील गावे लगतच्या बिगर आदिवासी क्षेत्रातील गावांपेक्षा आर्थिकदृष्ट्या मागासलेली असावी.भोकर (जि.नांदेड) तालुक्यातील ३३ गावे वरीलप्रमाणे ४ ही निकषांची पुर्तता करीत नसल्याने या ३३ गावांचा समावेश अनुसूचित क्षेत्रात करण्यासाठी केंद्र शासनास प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

राज्यातील वनरक्षक व वन सेवकाची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

(४८) १३७०४ (२१-०७-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जागतिक वन दिनानिमित्त वन विभागाच्या पदक वितरण सोहळा कार्यक्रमात वने मंत्री यांनी वनखात्यातील कामाचा आढावा घेऊन रिक्त पदे भरती करण्याची घोषणा दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे व मनुष्यबळाअभावी वनसंवर्धन व वन कायद्याची अंमलबजावणी करण्यास मोठ्या

प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन खात्यातील रिक्त पदांच्या भरतीच्या अनुषंगाने राज्यातील लाखो विद्यार्थ्यांनी नोकर भरतीची तयारी सुरु केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात १४००० हून अधिक वन विभागांतर्गत वनसेवकांची १३००० व वनरक्षकांची सुमारे १६०० रिक्त पदे भरण्याबाबत वन विभागामार्फत अधिकृत अधिसूचना जाहिरात व परीक्षा आराखडा तयार करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील वनरक्षक व वन सेवकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (०३-०९-२०२५) : (१),(२) व (३) हे खरे नाही. मा. मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९ व १० एप्रिल,२०२५ रोजी नागपूर येथे वनविभागाच्या झालेल्या आढावा बैठकीत मा. मंत्री (वने) यांनी वन विभागातील रिक्त पदांबाबत सरळसेवा भरती प्रक्रिया राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
(४) व (५) वन विभागामध्ये सद्यस्थितीत वनसेवकांची पदे निर्माण झालेली नाहीत. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९.०७.२०२५ च्या शासन निर्णयातील सूचना विचारात घेऊन वन विभागातील रिक्त ९६६ वनरक्षक या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी या पदांची बिंदुनामावली प्रमाणित करण्याची कार्यवाही संबंधित वनवृत्त स्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील भूमी अभिलेख विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी बेमुदत काम बंद आंदोलन केल्याबाबत

(४९) १३८४६ (२१-०७-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूमी अभिलेख विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध न्याय मागण्यासाठी बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले असून या आंदोलनात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ९० टक्के भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला असल्याचे दिनांक ६ जून, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गठीत करण्यात आलेल्या तज्ज्ञांच्या समितीने दिनांक १ डिसेंबर, २०२१ रोजी अहवाल शासनास सादर केला असून त्यामध्ये भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतन श्रेणी लागू करण्यात यावी असे स्पष्ट नमूद करूनही शासनाकडून अद्यापपर्यंत अंमलबजावणी झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुसार उक्त विभागातील कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतन श्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०८-२०२५) : (१) होय हे खरे आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील भूमि अभिलेख विभागातील कर्मचारी यांनी दिनांक ०५.०६.२०२५ रोजी संपात सहभागी होऊन संपास पाठिंबा दिलेला होता. सदर संपात सिंधुदूर्ग जिल्यातील वर्ग-३ च्या कार्यरत एकूण ७१ कर्मचा-यांपैकी ४८ कर्मचारी संपात सहभागी झाले होते. तसेच वर्ग-४ च्या एकूण ९ कर्मचा-यांपैकी ५ कर्मचारी संपात सहभागी झाले होते.
(२) हे अंशत: खरे आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दिनांक ०१.१२.२०२१ रोजी शासनास अहवाल सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशी विचारांत घेवून भूमि अभिलेख विभागांतील कर्मचा-यांना सूधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीसमोर सादर करण्यात आला होता. वेतनत्रुटी निवारण समितीने सदरचा प्रस्ताव अमान्य केला आहे.

(३) भूमि अभिलेख विभागातील कर्मचा-यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील सुधारित प्रस्ताव जमाबंदी आयुक्त आणि संचालक, पुणे यांनी दिनांक १८/६/२०२५ रोजी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वरवट (ता.हदगाव, जि.नांदेड) येथील दोन मुलीसह एका महिलेचा खदानीत बुडून मृत्यू झाल्याबाबत

(५०) १४७३८ (१९-०८-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरवट (ता.हदगाव, जि.नांदेड) येथील दोन मुलीसह एका महिलेचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे तसेच गारगव्हाण येथे अनधिकृत उत्खननामुळे तयार झालेल्या खदानातील पाण्यात बुडून दिनांक २९ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान दोन तरुणांचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मृत पावलेल्या तरुणांच्या कुटुंबियांना शासनाकडून कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०९-२०२५) : (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) हदगांव तालुक्यातील मौ.वरवट येथील ०३ व्यक्तींचा वरवट गावच्या शेजारी चुंचा पांदन रस्त्यावर असलेल्या नाला ओलांडून येत असताना अतिवृष्टीमुळे अचानक पावसाचे पाणी वाढल्याने पाण्याच्या प्रवाहाची गती व पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाण्याच्या प्रवाहात वाहून जाऊन मृत्यु झाला. मृत्यु झालेल्या ०३ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी ०४ लक्ष मदत देण्यात आली आहे.

मौजे गारगव्हाण येथील ग.नं.८७ मध्ये करण्यात आलेल्या उत्खननाच्या खदानीमध्ये साचलेल्या पाण्यात पाय घसरून पडल्याने बुडून दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यानुषंगाने पोलिस स्टेशन मनाठा, ता.हदगांव येथे दिनांक ३०.०५.२०२५ रोजी आ.मू.क्र.००१४/२०२५ व क्र.००१५/२०२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मृत्यू पावलेल्या (१) मौजे गारगव्हाण येथील मयत निखिल कुंडलिक वाढवे.(२) मौजे नेवरी येथील मयत संघर्ष बाळू परघने यांच्या वारसांना मदत मिळण्यासाठी अनुक्रमे गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना व मा.मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून सुरू आहे..
(४) प्रश्नच उदभवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.